नि.दि.दा.क्र. १७१/२०२१
आदेश निशाणी क्रमांक ५ खाली

**MHBU130026362021**

**आदेश निशाणी क्रमांक ५ खाली.**
**अक्षय उर्फ योगेश दुबे -वि- सरला दुबे**

सदरचा दावा चिखली येथील सर्वे नं. ८६ मधील मालमत्ता क्र. २२ मध्ये जागा व त्यावरील बांधकाम याबाबत मालकी हक्काचा ठराव तसेच दि. १९.०७.२०११ रोजीचे मृत्यूपत्राबाबत ठराव व कायमचा मनाई आदेश मिळण्याकरीता दाखल केला आहे. दावा प्रलंबित असताना प्रतिवादीने दावा मिळकतीबाबत त्रयस्त इसमांचे हक्क निर्माण करु नये असा तात्पुरता मनाई आदेश मिळण्याची विनंती सदर अर्जामध्ये केली आहे.

०२. वादीने कथन केले आहे की, मयत शकुंतलाबाई रामप्रसाद दुबे ही वादीची आजी होती. प्रतिवादी वादीची चुलती आहे. दि. ०८.१२.२००४ रोजी आजी शकुंतलाबाई हिने दावा मिळकतीचे मृत्यूपत्र वादीच्या लाभात करुन ठेवले आहे. असे असताना दि. १२.०१.२०११ रोजी तिने दुसरे मृत्यूपत्र गिरीशकुमार यांच्या दबावाने केलेले आहे. त्यावेळी अर्धिसंपत्ती म्हणजेच तळमजला वादीला दिल्याचे गिरीशकुमार यांनी सांगीतले आहे. दावा मिळकत रामप्रसाद याच्या उत्पन्नातुन रक्कम रुपये ३००/- ला खरेदी केली होती. शकुंतलाबाई हिचे कोणतेही स्वतंत्र उत्पन्न नव्हते त्यामुळे सदर संपत्ती तिच्या मालकीची होत नाही. तिला मिळकत हस्तांतर करण्याचा अधिकार राहत नाही. वादीचे वडील सरकारी वकिल म्हणून नोकरी करत असल्याने बाहेर राहत होते. शकुंतलाबाई आजारी असल्यामुळे ती उपचार घेत होती. शेवटी तिला दम्याचा त्रास होता. वादी व तिची आई तळमजल्याला राहून शकुंतलाबाई हिची काळजी घेत होते. प्रतिवादी व तिचे पती पहिल्या माळयावर राहत होते. प्रतिवादीच्या पतिला लहानपणापासून फिट येण्याचा आजार होता. तो स्वार्थी असल्याने त्याने वडीलाच्या उत्पन्नातुन स्वतःच्या नावावर मिळकत खरेदी केली. गिरीश याने शकुंतलाबाई हिच्या वयाचा व आजारपणाचा गैरफायदा घेऊन दि. १९.०७.२०११ रोजी बोगस मृत्यूपत्र अस्तित्वात आणले व त्यावर शकुंतला हिच्या नंतर सहया घेतल्या. वादीला सदर मृत्यूपत्राची माहीती ऑक्टोबर २०२१ मध्ये प्रथम झाली. वादी त्यावेळी अज्ञान असल्याने सज्ञान झाल्यानंतर त्याने लगेचच दावा दाखल केलेला आहे. दावा प्रलंबित असताना प्रतिवादीने त्रयस्त इसमाचे हक्क निर्माण करु नये अशी विनंती सदर अर्जाद्वारे केलेली आहे.

०३. प्रतिवादीने निशाणी १६ वर लेखी जबाब व अर्जास म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादीने नाते संबंध कबुल केलेले आहे व दाव्यातील इतर कथन नाकारलेले आहे. वादीचे वडील हयात असताना सखुबाई हिने दि. १९.०७.२०११ रोजी केलेले मृत्यूपत्र आव्हानित करण्याचा वादीला हक्क नाही वा दावा मुदतीत दाखल केलेला नाही. सखुबाई हिने तिचे स्त्रीधन व नातेवाईकांकडून मिळालेल्या रकमेतुन मिळकत खरेदी केली होती. दावा मिळकतीची जागा तिने सन १९७१ साली ३००/- रुपयात खरेदी केली आहे व तेव्हापासून ती त्याची मालक आहे. खरेदी मिळकत तिने स्वतः बांधकाम केले आहे. सखुबाई दि. १६-१२-२०११ रोजी मयत झाली तोपर्यंत ती शरीराने व मनाने व्यवस्थित होती. ती चांगल्या स्थितीत असताना तिने दोन साक्षीदारासमक्ष दि. १९.०७.२०११ रोजी मृत्यूपत्र करून गिरीश यास दिलेली आहे. सदर मृत्यूपत्र नोंदणीकृत आहे. सदर मृत्यूपत्राप्रमाणे महसूल दप्तरी गिरीशकुमार याच्या नावाची नोंद झाली. शकुंतला हिने वादीने कथन केल्याप्रमाणे दि. ०८.१२.२००४ व १२.०१.२०११ रोजी कोणतेही मृत्यूपत्र केलेले नाही.

०४. दि. १८.११.२०१४ रोजी गिरीश कुमार याने क्रांतीकुमार याच्याकडे ताबा मागीतला होता व तशी नोटीस दिली होती. त्याप्रमाणे ऑगस्ट २०१६ मध्ये क्रांतीकुमार याने दावा मिळकतीमधील दावा सोडला व तो अनुराधानगर येथे मिळकत खरेदी करुन राहण्यास गेला. क्रांतीकुमार याने सोडलेली जागा तोंडी विनंतीवर अजय तिवारी यांना काही कालावधीकरीता दिली होती. तिवारी यांनी सदर जागा वेळेत सोडली नाही म्हणून त्याबाबतचा वाद विशेष दावा क्र. १३/२०१८ नुसार प्रलंबित आहे. गिरीश कुमार मयत झाल्यानंतर प्रतिवादीचे नाव मालकीहक्काने नोंद झाले आहे व दावा मिळकत प्रतिवादीच्या ताब्यात आहे. दाव्यास व अर्जास कोणतेही कारण नसताना प्रतिवादीला त्रास देण्याकरीता सदरचा दावा व अर्ज केलेला आहे. करीता अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०५. युक्तीवाद ऐकला दस्ताऐवज पाहिले वादिने दाव्यासोबत सन २००४ चे मृत्यूपत्राची छायांकित प्रत तसेच २०११ मध्ये दोन मृत्यूपत्राच्या छायांकित प्रति दाखल केलेल्या आहेत. वादी व प्रतिवादी यांच्यात दावा मिळकतीचा मालकी हक्क शकुंतलाबाई

हिचा वयक्तीक होता किंवा नाही याबाबत तसेच शकुंतला हिने नोंदविलेल्या मृत्यूपत्राबाबतचा आहे. आज रोजी शकुंतला हिच्या मृत्यूपत्राप्रमाणे दावा मिळकत प्रतिवादीच्या नावाने नोंद आहे ही बाब वादीने कबुल केलेली आहे. वादीने दाखल केलेल्या मनाई अर्जामध्ये तात्पुरता मनाई आदेश मिळण्याबाबत कोणतेही कारण नमुद केलेले नाही. न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादीला दावा मिळकतीमध्ये त्रयस्त इसमाचे हक्क निर्माण करण्यापासून तात्पुरता मनाई आदेशाने प्रतिबंध करावा अशी विनंती केलेली आहे.

०६. प्रथमदर्शनी दाव्यात आव्हानित केलेले मृत्यूपत्र सन २०११ सालीचे आहे. सदर मृत्यूपत्राप्रमाणे प्रतिवादीच्या पतिची व त्यानंतर प्रतिवादीच्या नावाची नोंद महसुल दप्तरी झाल्याचे कथन आहे. तेव्हापासून प्रतिवादीने दावा मिळकतीबाबत कोणत्याही त्रयस्त इसमाचे हक्क निर्माण केले नाही. प्रथमदर्शनी दावा मुदतीत आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे. दावा मुदतीत आहे कींवा नाही हि बाब वादी व प्रतिवादी यांच्या पुराव्यानंतर निश्चित होणार आहे. आज रोजी दावा मिळकतीबाबत त्रयस्त इसमाचे हक्क निर्माण करु नये असा आदेश प्रतिवादी विरुध्द होणे गरजेचे आहे कींवा नाही हे पाहणे गरजेचे आहे. वादीने अर्जामध्ये प्रतिवादी सदर मिळकतीबाबत त्रयस्त इसमाचे हक्क निर्माण करण्याच्या तयारीबाबत कोणतेही कथन केलेले नाही. तात्पुरता मनाई आदेश मिळण्याकरीता दाखल केलेल्या अर्जास कोणतेही कारण नमुद केलेले नाही. वादीने आव्हानित केलेले मृत्यूपत्र व त्याचा कालावधी पाहिला असता आज रोजी वादीने मागणी केल्याप्रमाणे तात्पुरता मनाई आदेश मिळण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही. मागणी केल्याप्रमाणे तात्पुरता मनाई आदेश न दिल्याने वादीचे कधीही न भरुन येणारे असे कोणतेही नुकसान होणार नाही. करिता खालील प्रमाणे आदेश.

## <u>आदेश</u>

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

स्वा/-

(एच.डी.देशिंगे)

दिनांक २६.११.२०२४ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चिखली

नि.दि.दा.क्र. १७१/२०२१
आदेश निशाणी क्रमांक ५ खाली

Certificate

I G.V. Nimje, Stenographer affirm that the contents of this PDF file Judgment/ Order are same words, as per original Judgment/Order.